दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/९५/२०१८
दि.१३/०७/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.केतन हादाभाई बारीया,
१०४, भवानी ज्योत टॉवर, चंदन पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व). ................अपिलार्थी

जनमाहिती अधिकारी तथा,
आस्थापना अधिक्षक (आस्थापना) ................प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.केतन हादाभाई बारीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१९/०६/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१. Non practice a launce च्या शासन परिपत्रकाची सत्यप्रत करुन द्यावे.
२. आता पर्यंत किती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी Non practice a launce साठी पत्र दिलेला आहे. त्या सर्व पत्रांची सत्यप्रत करुन द्यावे.
३. सदर पत्रानुसार सामान्य प्रशासन, आस्थापना व आयुक्तांचे मान्यता याबाबत त्यांची जबाबदारी निश्चीत करुन खाजगी वैद्यकिय सेवा करण्याकरिता मंजुरी देणाऱ्या सर्व आयुक्तांची, सर्व सामान्य प्रशासन अधिकाऱ्यांची, सर्व आस्थापना अधिकाऱ्यांची नावे, पदनाम व सदर विभागात कालावधी या सर्व कागदपत्रांची सत्यप्रत करुन द्यावे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत अपुर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.०६/०७/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१३/०७/२०१८ रोजी दुपारी १२.४५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३२३/२०१८ दि.१६/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- मला दि.१९/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती दिलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती दिलेली असुन सदर माहिती मुद्देनिहाय व अपुर्ण असल्याचे अपिलार्थी अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान सांगितले आहे. सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक यांनी अपिलार्थी अर्जदारास पुनश्च: मुद्देनिहाय सुधारित माहिती १० दिवसांत विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.केतन हादाभाई बारीया (संपादक निर्भय प्रचारक),
१०४, भवानी ज्योत टॉवर, चंदन पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.